# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/10/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. उमरेड :–** फिर्यादी व विधीसंघर्ष बालक हे एकाच गावात शेजारी राहत असुन एकमेकांना ओळखतात. दिनांक १५/१०/२०२३ चे रात्री २०/०० वा. दरम्यान फिर्यादी जेवन बनवुन अल्पवयीन पिडीता (वय ०६ वर्ष) हिला बोलवण्यासाठी बाहेर गेली असता तेथे पिडीता दिसली नाही. त्यामुळे तेथे खेळत असलेल्या मुलांना विचारले असता त्यांनी सांगितले की पिडीता विधीसंघर्ष बालकाच्या घरी गेली आहे. तेव्हा फिर्यादी ही विधीसंघर्ष बालकाच्या घरी रात्री २०/३० वा. पिडीतेला आणायला गेली असता समोरच्या जुन्या घराचा दरवाजा आतुन बंद होता दरवाजाच्या फटीतुन पाहीले असता विधीसंघर्ष बालक हा पिडीतेशी जबरी संभोग करीत होता. त्यानंतर फिर्यादीने व तिचे पतीने पिडीताला विचारपूस केली तेव्हा पिडीतेने सांगितले की विधीसंघर्ष बालक याने पिडीतेला जबरदस्तीने आपले घरी नेवून घराचे दोन्ही दरवाजे बंद करूण तिचाशी जबरी संभोग केला. याआधी सुध्दा विधीसंघर्ष बालकाने पिडीता सोबत दोनदा असेच केले आहे असे पिडीतेने सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे विधीसंघर्ष बालक याचे विरूद्ध कलम ३७६, ३७६ एबी, ३७६(२) (एन), ३७६(२) (जे) भादवी, बालकांचे लैंगीक अपराधा पासुन संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक सुचिता मंडावले मो. नं. ९७६३२३४५४८ या करीत आहे.

### मोटरपंप चोरी

**पो.स्टे. काटोल :–** अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील मौजा जटामझरी शिवार येथे दिनांक १३/१०/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक १४/१०/२०२३ चे सकाळी ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश शेषराव सावरकर, वय ६४ वर्षे रा. जटामझरी ह. मु. नरखेड जि. नागपुर याची ५ एकर शेती असुन ती वासुदेव लक्ष्मणराव भारसकरे यांना बटाईने दिली असुन सध्या शेतात पराटीचे पीक असुन पिकांना पाणी ओलवण्याकरीता शेतात विहीर खोदली असुन त्या विहीरीत ३ एच. पी. मोटार लावलेली आहे. दिनांक १४/१०/२०२३ रोजी सकाळी फिर्यादी हा त्याचे शेतात वडीलाचे पात्र टाकण्यासाठी गेले असता वासुदेव भारसकरे हे फिर्यादीचे घरी आले व सांगीतले की त्याने दि. १३/१०/२०२३ रोजी सकाळी ०९/०० वा. मोटार चालु केली व संध्याकाळी बंद करून घरी आला असता दि. १४/१०/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. विहीरीवर लावलेली ३ एच. पी. जुनी मोटार किंमती ३,५००/– रू. ची असलेली विहीरीत दिसली नाही. ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक राठोड पोस्टे काटोल मो. नं. ८६६८२८४५६८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर